शब्दांचा अवकाश




जयंत नारळीकर

jayant@iucaa.ernet.in

# जुनं ते सोनं; पण वाचवायचं कसं?

पुणे शहराची कीर्ती शिक्षणाची राजधानी आणि फुलत चाललेली विज्ञाननगरी अशी आहे; पण पॅरिसनं 'रेकोले' या ४०० वर्षांच्या जुन्या इमारतीबाबत जी उदार नीती दाखवली, ती पुणं १०० वर्षांच्या का होईना, एखाद्या जुन्या इमारतीबाबत दाखवेल? मी पुष्कळ विचार केला; पण मला अद्याप होकारार्थी उत्तर मिळू शकलेलं नाही. १०० वर्षांची जुनी इमारत न पाडता तिचं नूतनीकरण करणं व तिचा वापर स्वतः न करता ती अभ्यागत विद्वानांसाठी ठेवणं, हे पुण्याच्या सध्याच्या 'कल्चर'मध्ये कसं बसेल?



नूतनीकरणानंतर रेकोलेच्या इमारतीचं आजचं रूप.

सन २००३ च्या ऑक्टोबर महिन्यात मी आणि पत्नी एका वर्षासाठी पॅरिसमध्ये आलो. पॅरिसमधल्या 'कोलेज द फ्रान्स' या प्रख्यात संस्थेनं तिथल्या आंतरराष्ट्रीय अध्यासनासाठी प्राध्यापक म्हणून वर्षभरासाठी मला आमंत्रित केलं होतं; पण त्या मानाच्या आमंत्रणाबद्दल एक काळजीची बाब होती. निमंत्रित प्राध्यापकानं निवासाची सोय कुठं करायची? त्या शोधकार्यात अर्थातच निमंत्रक संस्थेची मदत मिळे; पण अखेरीस तो प्रश्न कसा सुटेल, याची 'गॅरंटी' नसे. अशा पार्श्वभूमीवर कोलेजमधले माझे यजमान प्राध्यापक पेकेअर यांची ई-मेल आली : "आपला प्रश्न सुटला! तुमची सोय रेकोले इथल्या फ्लॅटमध्ये होईल." पुढं त्यांनी अधिक तपशील दिला होता; पण त्या तपशिलापेक्षा रेकोले ह्या इमारतीचा इतिहास रोचक आहे आणि आपणां भारतीयासाठी उद्बोधकही!

रेकोले ही इमारत सतराव्या शतकात पॅरिसच्या पूर्व भागात बांधण्यात आली. आज तिच्यासमोर पॅरिसचं रेल्वे स्टेशन गारदलेस्त (पूर्वेचं स्टेशन) उभं आहे. इमारतीचं नाव तीत राहणाऱ्यांवरून पडलं. मुळात या इमारतीत रेकोले नावाच्या रोमन कॅथॉलिक पंथात असलेले भिक्षू राहत असत. सामान्यपणे कॅथॉलिक धर्माचे रीती-रिवाज पाळण्याचं बंधन अशा पंथावर असूनदेखील रेकोले भिक्षूंनी पोपकडून वेगळी परवानगी काढली होती : "आम्हाला धार्मिक मुद्द्यांवर पुष्कळ चर्चा आणि आत्मचिंतन करायचं आहे, तेव्हा नेहमीच्या रीती-रिवाजांपासून, कर्मकांडातून आम्हाला सुट्टी द्या." भिक्षूंची ही विनंती पोपमहाशयांनी स्वीकारली आणि या इमारतीत त्या पंथाची सोय केली.

१६०३ पासून १७८९ पर्यंत रेकोले पंथ ही इमारत वापरत होता. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली. राजे, सरदारलोक उद्ध्वस्त झाले तसेच धार्मिकही. त्यातच रेकोले पंथाची वाट लागली असणार. इमारतीत आता विणकरांची संयंत्रं काम करू लागली. पुढे फ्रान्सचा राजा नेपोलियन तृतीय यानं इथं रुग्णालय सुरू केलं. इमारतीचा हां अवतार १९६८ पर्यंत होता; पण व्यवस्थापनाच्या अभावामुळं त्याला अवकळा येत गेली. रुग्णालय बंद पडून 'इमारतीच्या आवारात भटक्यांची झोपण्याची जागा' अंशी त्याची कीर्ती (?) पसरत गेली. अखेर गेल्या शतकातल्या शेवटच्या दशकात पॅरिस म्युनिसिपल कॉर्पोरेशननं इमारतीचा ताबा घेतला... आणि काय केलं त्या जागेचं?

जुनी इमारत (जवळजवळ ४०० वर्षांची!) पाडून तिथं 'मल्टिस्टोरी' इमारत बांधली किंवा मोठा मॉल उभा केला का? की बिल्डर्सना ती जागा लिलाव करून विकली? काही झालं तरी पॅरिससारख्या शहरात अशा मोक्याच्या जागेची किंमत किती असेल, याची कल्पना करावी! पण पॅरिस म्युनिसिपाल्टीनं असं काहीही केलं-नाही. सर्वात प्रथम कॉर्पोरेशननं ती इमारत 'हेरिटेज'मध्ये घेतली. याचा अर्थ तुम्ही ती पाडू तर शकतच नाही; पण बाहेरून तिचं रूप बांधकामानं बदलूही शकत नाही; अर्थात दुरुस्ती, डागडुजीला वाव ठेवून!

त्यानंतर इमारतीचे बाहेरून नूतनीकरण करून तिचं १६०३ मधलं बाह्यरूप परत आणण्यात आलं; पण आतून पुष्कळ बदल करून मूळ रेकोलेच्या मोठ्या खोल्यांचं रूपांतर लहान फ्लॅट्समध्ये करण्यात आलं. अपवादात्मक म्हणून जरा मोठे असे काही फ्लॅट होते. त्यातला एक पेकेअर महाशयांनी माझ्यासाठी राखून ठेवला. तो कशाच्या बळावर?

तर पॅरिस म्युनिसिपल कॉर्पोरेशननं हे सर्व फ्लॅट पॅरिसमधल्या सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक संस्थांसाठी राखून ठेवले होते. उद्देश हा की अशा संस्थांना भेट देणाऱ्या परदेशी विद्वानांची घरकुलाची समस्या सुलभपणे सुटो. अशा कार्यवाहीमुळं माझी स्वतःची सोय झालीच; पण त्याचबरोबर 'पंडितमैत्री, सभेत संचार' हेही मला शक्य झालं. कारण रेकोलेमध्ये विविध विषयांवर चर्चासत्रं आयोजित केली जातात. अगदी शिवाजीमहाराजांच्या काळात अस्तित्वात असलेल्या इमारतीत आम्ही वर्षभर राहिलो, हेदेखील आम्हाला रोमांचकारक वाटलं.या सर्व प्रकरणात मला पॅरिसनगरीच्या उदात्ततेचा आविष्कार जाणवला. ज्या नगराची कीर्ती साहित्य-संगीत-कला-विज्ञान यांची आश्रयदाती म्हणून अनेक शतकं टिकून आहे, अशा शहराकडून हे सहजगत्या केलं जाईल, असा विश्वास काही अनाठायी नव्हे!

*****

पुणे शहराची कीर्तीही शिक्षणाची राजधानी आणि फुलत चाललेली विज्ञाननगरी अशी आहे; पण पॅरिससारखी उदार नीती पुणं दाखवेल का? मी पुष्कळ विचार केला; पण मला अद्याप होकारार्थी उत्तर मिळू शकलेलं नाही.

**उदाहरणार्थ** : रेकोलेसारखी ४०० वर्षांची नाही, पण १०० वर्षांची एखादी इमारत असेल तर तिच्याकडं पाहायची दृष्टी इथं वेगळीच आहे. क्षेत्रफळ, एफएसआयच्या गुणाकारातून कोट्यवधींची 'मल्टिस्टोरी' इमारत किंवा मॉल कसे उभारता येतील, याचं गणित मांडलं जाईल, अर्थात ती इमारत पाडून! आपल्याकडं अमुक एका कायद्याखाली एखादी जागा आणि तीवरील इमारत संरक्षित असेल तर तो नियम कसा बदलायचा, यावर विचारमंथन होईल! अशा पार्श्वभूमीवर इमारत न पाडता तिचं नूतनीकरण करणं व तिचा वापर स्वतः न करता ती अभ्यागत विद्वानांसाठी ठेवणं हे पुण्याच्या सध्याच्या 'कल्चर'मध्ये कसं बसेल?

पॅरिसमध्ये एकेकाळी फॅक्टरी असलेली सित्रॉन कार कंपनी शहराबाहेर गेली, तेव्हा त्यांच्या जमिनीचं काय झालं? ती एका मोठ्या पार्कसाठी आणि बगिच्यासाठी वापरण्यात आली. ह्या मोठ्या बगिच्याचा फायदा सर्व नागरिक व पाहुणे घेतात. सु नियोजित फुलझाडं व आरामात बसण्याच्या जागा, लहान मुलांना ज्यांच्याबरोबर खेळता येईल अशी कारंजी...याशिवाय तिथं एक भाग सर्वस्वी नैसर्गिकरीत्या वाढणाऱ्या झाडाझुडपांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. अशा स्थितीत पुण्यात काय झालं असतं? आपल्या शेजारी असलेल्या पुण्याच्या मोठ्या बहिणीचं - मुंबईचं - उदाहरण सर्वश्रुत व बोलकं आहे!

## रामबाण

श्रीराम ग. पचिंद्रे

'पँथर' असल्याचे 'आठवले' म्हणून
डरकाळी फोडून
सांगू लागले...
शिकार
टप्प्यात येण्याआधीच
सिंहाचा वाटा
मागू लागले...